




दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २९४ वा | गुरूवार दि ०५ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# जनता रांगेत मात्र साहेब मैदानात!



## बुलढाणा जिल्हा परिषद वर मात्र झाला मोठा संतापाचा स्फोट!....

## तीन दिवस महोत्सव,शेकडो समस्या प्रलंबित; प्रशासन नेमकं कोणासाठी?

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषद प्रशासनाने फेब्रुवारी महिन्याची सुरुवात उत्सवाने केली असली तरी सामान्य नागरिकांच्या कामांचा अक्षरशः बोजवारा उडाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. ४, ५ आणि ६ फेब्रुवारीला जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक महोत्सवाच्या नावाखाली अधिकारी-कर्मचारी पूर्णपणे मैदानावर तैनात राहणार असल्याने कार्यालयीन कामकाज ठप्प होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.आधीच २ फेब्रुवारीला शालेय क्रीडा स्पर्धा पार पडल्या, त्यानंतर नियोजनाच्या नावाखाली दिवस गेला आणि आता सलग तीन कामकाजाचे दिवस महोत्सवात खर्ची घालण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जिल्ह्यात कर्मचारी तुटवडा, प्रलंबित फाईली,रखडलेली

### शासकीय खेळ कामासाठी नाही वेळ कसा बसवता मेळ!

कामे आणि नागरिकांच्या तक्रारींचा ढिगारा वाढत असताना कामकाजाच्या दिवशीच महोत्सव ठेवण्यामागचं नेमकं तर्क काय, असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत.जिल्हाभरातून येणाऱ्या शेतकरी,विद्यार्थी,महिला व सर्वसामान्यांना ङ्गसाहेब महोत्सवात आहेतफ असं उत्तर मिळालं तर त्यांच्या प्रश्नांचं काय? आधीच पाणीटंचाई, खराब रस्ते, आरोग्य सुविधा आणि शासकीय योजनांतील अडथळ्यांनी जनता त्रस्त असताना प्रशासन मात्र उत्सवाच्या रंगात रमल्याचं चित्र आहे. विशेष म्हणजे ७ फेब्रुवारीला शनिवार आणि ८ फेब्रुवारीला रविवार असल्याने जवळपास संपूर्ण आठवडाच कामकाजाविना जाणार आहे. मग जनतेच्या समस्या ऐकणार कोण आणि प्रलंबित कामांची भरपाई कधी होणार, हा ज्वलंत प्रश्न आहे. उत्सव आणि स्पर्धा आवश्यक असल्या तरी त्या सुट्टीच्या दिवशी आयोजित करता आल्या नसत्या का,असा रोखठोक सवाल आता जिल्हा परिषद प्रशासनावर होत आहे. जनतेच्या पैशावर चालणाऱ्या यंत्रणेने उत्सवाबरोबरच जबाबदारीची जाणीव ठेवावी,अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे

# बालविवाहाच्या गाठी सोडवताना...



दररोज सकाळी कोणतेही वर्तमानपत्र किंवा कुठल्याही वाहिन्यांवरील बातम्यांमध्ये एकदा तरी भारताच्या विकासाबाबत चार शब्द आपल्या कानावर पडतात, दिसतात. आपला देश महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे. प्रगतीचा वेग वाढतो आहे. आर्थिक आणि सामाजिक पातळीवर मोठ्या प्रमाणात बदल होत असून तरुण मंडळी या बदलाचे नेतृत्व करत आहेत. हे सारे खरे. मात्र, विकासाचा वेग वाढत असताना विचारांचा, जाणिवांचा आणि माणूस म्हणून जगण्याच्या हक्कांशी बांधील राहण्याचा विचार केला नाही, तर आपण भूलचक्रात अडकून पडण्याची भीती आहे. भौतिक, पायाभूत, वैज्ञानिक, तांत्रिक विकासाच्या गतीने सामाजिक बदलही झाले तरच ते परिपूर्ण प्रगतीचे द्योतक असते. त्यामुळेच भारतातील सुधारणावादी, प्रगतिशील विचारवंतांचे, काळाशी सुसंगत परंपरेचे बोट धरूनच आपण पुढे जायला हवे एकीकडे उत्पन्नाचे आकडे, वेतनाच्या आकड्यातील शून्यांची संख्या वाढत असतानाच दुसरीकडे हुंडाबळी, घरगुती हिंसाचाराने त्रस्त सुशिक्षित मुलींची उदाहरणेही समोर येतात. मुलींचा जीव घेण्यापर्यंत हव्यास वाढतो, अपेक्षा वाढतात आणि न पेलवणाऱ्या ओझ्याखाली मुली, त्यांचे कुटुंबीय अक्षरशः दबून जातात. असेच आणखी एक सामाजिक ओझे म्हणजे भारतातील बालविवाह. ज्या देशामध्ये ७० टक्के जनता ही ग्रामीण भागांत राहते, तिथे विकासाची कल्पना ही वरवरची आणि फक्त पायाभूत सुविधांपुरती मर्यादित असू शकत नाही. अन्न, वस्त्र, निवारा आणि जगण्याचा हक्क या चार मूलभूत गोष्टींचा झगडा अद्याप संपलेला नाही. त्यामुळेच वरवरच्या बदलांआधारे देश विकसित झाल्याचे सांगण्याची चैन आपल्याला परवडणारी नाही, याची जाणीव होऊन केंद्र सरकारने सामाजिक सुधारणेच्या पातळीवर एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. २०४७पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या दृष्टीने सामाजिक चौकट आणि जडणघडण ही महत्त्वाची असणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारने शंभर दिवसांचे ङ्ग बालविवाहमुक्त भारत म अभियान हाती घेतले आहे. २०३० पर्यंत भारतातून बालविवाहाची अनिष्ट प्रथा समूळ नष्ट करण्याच्या उद्देशाच्या पूर्तीसाठी टाकलेले पहिले पाऊल म्हणून या अभियानाकडे पाहिले जात आहे. विविध पातळ्यांवर, टप्प्यांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी होणार आहे. सरकारच्या वतीने २७ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झालेली ही मोहीम ८ मार्च २०२६ पर्यंत सुरू राहील. त्याचा पहिला टप्पा (२७ नोव्हेंबर-३१ डिसेंबर) पूर्ण झाला. यामध्ये शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वादविवाद, निबंध स्पर्धा आणि प्रतिज्ञा समारंभातून बालविवाहविरोधी जागृती करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात (१-३१ जानेवारी) धर्मगुरू, समाजातील प्रभावशाली व्यक्ती आणि विवाह सेवा पुरवणाऱ्या मंडळींना या कामात सहभागी करून घेत अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे. तर १ फेब्रुवारी ते ८ मार्च या तिसऱ्या टप्प्यात ग्रामपंचायती आणि नगरपालिकेचे प्रभाग बालविवाहमुक्त झाल्याचे घोषित करणारे ठराव मंजूर करण्यास प्रोत्साहित देण्यात येईल. या मोहिमेचा उद्देश हा नागरिकांना संवादातून जाणिवांकडे नेण्याचा आहे. समाजाच्या सहभागाशिवाय अनिष्ट प्रथा या समूळ नष्ट होऊ शकत नाही, ही बाब लक्षात घेऊनच या अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे. बालविवाहाविरोधात सरकारी पातळीवर सुरू करण्यात आलेले हे प्रयत्न सकारात्मक असले तरी त्याची व्यापकता आणि ठोस कृतीची जोड हे अद्याप दिसत नाही. १३० कोटी नागरिकांच्या देशामध्ये जागरूकतेची धोरणे आखताना मोठ्या पटलाचा विचार करण्याची आवश्यकता असते. सरकारचा उद्देश थेट गावागावांत पोहोचवणारी, सक्षम काम करणारी यंत्रणा असावी लागते. त्यामुळेच या आघाडीवर सरकारला अधिक आक्रमकपणे आणि अंमलबजावणीच्या आग्रहाने उतरण्याची गरज आहे. सरकार आणि सामाजिक संस्थांच्या पातळीवर झालेल्या विविध सर्वेक्षणांतून बालविवाहांची आकडेवारी व्याप्ती चिंता करायला लावणारीच आहे. बालविवाहाचे प्रमाण तुलनेने कमी झाले असले तरी २०३०चे लक्ष्य पाहता हे आव्हान मोठेच असल्याचे जाणवते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार (२०१९-२०२१) भारताने बालविवाह कमी करण्याच्या दिशेने प्रगती केली आहे; परंतु आव्हाने कायम आहेत. सध्याच्या २०-२४ वर्षे वयोगटातील २३.३ टक्के महिलांचा विवाह हा त्या १८ वर्षांपेक्षा कमी वयात असताना झाला आहे. २००५-०६ मध्ये हे प्रमाण ४७.४ टक्क्यांच्या आसपास होते. त्यात सध्या आशादायी घट दिसत असली, तरी चित्र पूर्णपणे समाधानकारक नाही. बालविवाहाच्या बळी या मुलीच अधिक असतात. सध्याच्या २०-२४ वयोगटातील केवळ तीन टक्के पुरुषांचे लग्न १८ वर्षांपेक्षा कमी वयात झाले होते. राज्यांनुसार याचे प्रमाण लक्षणीय बदलते. पश्चिम बंगाल, बिहार आणि त्रिपुरामध्ये बालविवाहाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा अधिक आहे, तर केरळ आणि लक्षद्वीपसारख्या राज्यांमध्ये हे प्रमाण खूप कमी आहे. जागतिक पातळीवर विचार केला तर बालविवाह होणारा भारत हा पहिल्या क्रमांकाचा देश आहे. भारतात जवळपास चार मुलींपैकी एका मुलीचा विवाह आजही १८ वर्षे पूर्ण होण्याआधी होतो. महाराष्ट्रामध्ये हे प्रमाण २१.७ टक्के आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात २७.६ टक्के, तर शहरी भागांमध्ये १५.६० टक्के मुलींचे आजही १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच विवाह होतात. संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालाचा विचार केला तर जागतिक पातळीवरील प्रत्येक दहा मुलींमागील तिसऱ्या मुलीचा बालविवाह भारतात होतो. राजस्थान, बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल ही राज्ये बालविवाहाच्या बाबतीमध्ये अधिक संवेदनशील आहेत.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाबद्दल प्रफुल्ल पटेलांची मोठी घोषणा; सर्व चर्चा संपवल्या

**नवी दिल्ली :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार, यावरून मागील काही दिवसांपासून राजकीय रणकंदन सुरू आहे. प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची या पदासाठी चर्चा सुरू झाल्यानंतर तर्क-वितर्क लढवले जात होते. मात्र आता पटेल यांनी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. 'राष्ट्रवादी पक्षाच्या अध्यक्षपदाचा निर्णय योग्य रीतनेच होईल, योग्य दिशेनेच होईल, योग्य व्यक्तीचाच होईल आणि माझ्याशिवाय होईल,' असं म्हणत आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या स्पर्धेत नसल्याचं प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर केलं आहे.जे लोक कधीही लोकांमध्ये जाऊन निवडणूक



लढले नाहीत, अशा लोकांनी माझ्याबद्दल चर्चा करणं योग्य आहे का? १९५२ पासून माझ्या वडिलांना जनतेनं निवडून दिलं आणि मलाही अनेक वर्षे लोकांनी निवडून दिलं आहे. आमच्याबद्दल आणि आमच्या बॅकग्राऊंडबद्दल कोणी अशी चर्चा करत असेल तर त्यांना लाज वाटली पाहिजे,' असा हल्लाबोल प्रफुल्ल पटेल यांनी टीकाकारांवर केला आहे. तसंच 'आमच्याकडून राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाबद्दल कोणतंही वक्तव्य केलं गेलेलं नसताना उगाच हे वादळ निर्माण करणं आणि आमच्या पक्षात संशय निम र्ण करणं, ही अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे. आमच्या पक्षाच्या अध्यक्षपदाचा आम्ही योग्य निर्णय घेणार आहोत. मी सोडून इतर कोणाकडे तरी अध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाईल. योग्य व्यक्तीची या पदावर निवड केली जाईल. मी राष्ट्रवादीचा कार्याध्यक्ष म्हणून अजितदादांच्या निधनानंतर पुढे काय, नेतृत्व कोणाकडे, या सगळ्या गोष्टी बघण्याची जबाबदारी माझ्यावर आहे आणि मी ती योग्य रीतीने पार पाडत आहे,' असा दावा पटेल यांनी केला आहे.राष्ट्रवादीसारख्या रांगड्या पक्षाचा अध्यक्ष कोणीतरी मराठी झाला पाहिजे, कोणी पाटील चालेल, पण पटेल नको, असं म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधला होता. त्यावर उत्तर देताना पटेल म्हणाले की, ' राज ठाकरे किंवा इतर कोणी आमच्या पक्षाचा विधीमंडळ नेता किंवा अध्यक्ष कोण होणार, हे ठरवणार का? ते आमच्या पक्षाचे नेते आहेत का? राज ठाकरे असतील किंवा सकाळचे जे ९ वाजताचे बुलेटिन आहे , ते आम्हाला आम्ही काय करायचं सांगत आहेत. पण आम्ही उपमुख्यमंत्रिपदाबाबत जसा योग्य निर्णय घेतलाय, तसाच योग्य निर्णय राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाबद्दल घेऊ आणि त्याची प्रक्रिया सुरू आहे,' असं ते म्हणाले.

## मुंबई महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीबाबत अपडेट

**मुंबई :** मुंबई महापौर पदाच्या निवडणुकीबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मुंबई महापालिकेचा महापौर कोण होणार? याबाबत विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. विशेष म्हणजे महापालिका निवडणूक पार पडून आता १५ दिवसांपेक्षा जास्त दिवसांचा कालावधी लोटला आहे. तरीही महापौर पदासाठी निवडणूक कधी पार पडेल? याबाबत माहिती समोर येत नव्हती. विविध कारणास्तव महापौर पदाची निवडणूक पुढे सरकत होती. मुंबईत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या महायुतीला बहुमताचा आकडा गाठता आला आहे. पण दोन्ही पक्षांच्या गटाची नोंद ही उशिरा झाल्याने या निवडणुकीला विलंब झाला असं बोललं जात होतं. राज्यातील काही महत्त्वाच्या महापालिकांमध्ये महापौर आणि उपमहापौर पदाची निवड झाली आहे. पण मुंबईच्या महापौर पदाकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.मुंबई महापालिकेचं महापौर पद हे खुला महिला प्रवर्गासाठी आरक्षित असल्याचं जाहीर झालं होतं. यानंतर भाजप




की शिवसेना शिंदे गटाचा महापौर होईल? याबाबत साशंकता होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा मुक्काम मुंबईतील पंचतारांकीत हॉटेलमध्ये ठेवल्याने त्यांचा महापौर पदावर प्रबळ दावा असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण भाजपने आपला दावा सोडला नाही आणि शिंदे बॅक्फ़फूटवर गेल्याची चर्चा आहे. आता महापौर हा भाजपचाच होईल हे निश्चित असल्याची चर्चा आहे. यासाठी काही नावांची चर्चा आहे. येत्या ७ फेब्रुवारीला मुंबईच्या महापौरपदासाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. यानंतर ११ फेब्रुवारीला मुंबई महापालिकेत दुपारी १२ वाजता विशेष सभेचं आयोजन करण्यात आलं आहे.

## अनुभवी नगरसेविकेच्या नावावर शिक्कामोर्तब..

**पुणे :** महापालिका निवडणूक निकालाला दोन आठवडे उलटून गेल्यानंतर आता अखेर भाजपकडून पुण्याच्या म हापौरपदासाठीचं नाव निश्चित करण्यात आलं आहे. भारतीय जनता पक्षाच्या कोअर कमिटीने काल महापौरपदासाठी वर्षा तापकीर, मंजुषा नागपुरे आणि मानसी देशपांडे यांच्या नावाची शिफारस केली होती. महापौरपदाच्या नावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अंतिम मोहोर उमटवली गेली असून मंजुषा नागपुरे यांच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार आहे. पुणे महानगरपालिकेत महापौर आणि उपम हापौर निवड बिनविरोध होण्याची शक्यता असून उपमहापौर पद रामदास आठवले यांच्या आरपीआयला दिलं जाणार आहे. पुरेसं संख्याबळ नसल्याने महापौरपदासाठी अर्ज दाखल न करण्याची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसनं घेतल्याची माहिती आहे. त्याम ुळे महापौरपदी भाजपच्या मंजुषा नागपुरे यांची तर उपमहापौरपदी आरपीआयच्या परशुराम वाडेकर यांची निवड निश्चित मानली जात आहे. ९ फेब्रुवारी रोजी पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये आवाजी मतदानाने महापौरांची निवड होणार आहे.

## महापालिकेला महापौर-उपमहापौर मिळाले, कुणाला मिळाली संधी?

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या म हापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला रोहित पिंपळोलकर (गायकवाड) यांची, तर उपमहापौरपदी भाजपच्या कृष्णा दादू पाटील यांची मंगळवारी निवड झाली. या दोन्ही पदांची निवडणूक पिठासीन अधिकारी तथा ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ठाण्याच्या म हापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांची आणि उपमहापौरपदी भाजपच्या कृष्णा पाटील यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी करताच पालिकेच्या सभागृहात युतीचे नगरसेवक व नगरसेविकांनी शिवसेना, भाजप, रिपाई महायुतीचा विजय असो, अशा घोषणा देत जल्लोष केला.ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात मंगळवारी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला पिठासीन अधिकारी म्हणून ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ तसेच महापालिका सचिव मनीष जोशी उपस्थित



होते. या सभेत महापौर आणि उपम हापौरपदाची निवडणूक पार पडली. या दोन्ही पदांसाठी विरोधी पक्षाकडून एकही अर्ज दाखल करण्यात आला नव्हता. त्यामुळे महापौरपदासाठी शिवसेनेकडून अर्ज दाखल केलेल्या शर्मिला पिंपळोलकर यांची आणि उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केले.भाजपच्या कृष्णा पाटील यांची बिनविरोध निवड पिठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी केली. महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडीची घोषणा झाल्यानंतर ठाणे म हानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी नवनिर्वाचित महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि उपमहापौर कृष्णा पाटील यांचे तुळशीचे रोप देऊन अभिनंदन आणि स्वागत केले.

# ठाण्यात शिवसेना-भाजपचं ठरलं! महापालिकेला महापौर-उपमहापौर मिळाले, कुणाला मिळाली संधी?

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला रोहित पिंपळोलकर (गायकवाड) यांची, तर उपमहापौरपदी भाजपच्या कृष्णा दादू पाटील यांची मंगळवारी निवड झाली. या दोन्ही पदांची निवडणूक पिठासीन अधिकारी तथा ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ठाण्याच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांची आणि उपमहापौरपदी भाजपच्या कृष्णा पाटील यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी करताच पालिकेच्या सभागृहात युतीचे



नगरसेवक व नगरसेविकांनी शिवसेना, भाजप, रिपाई महायुतीचा विजय असो, अशा घोषणा देत जल्लोष केला.ठाणे म हानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात मंगळवारी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला पिठासीन अधिकारी म्हणून ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ तसेच महापालिका सचिव मनीष जोशी उपस्थित होते. या सभेत महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक पार पडली. या दोन्ही पदांसाठी विरोधी पक्षाकडून एकही अर्ज दाखल करण्यात आला नव्हता. त्यामुळे महापौरपदासाठी शिवसेनेकडून अर्ज दाखल केलेल्या शर्मिला पिंपळोलकर यांची आणि उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केले.भाजपच्या कृष्णा पाटील यांची बिनविरोध निवड पिठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी केली. महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडीची घोषणा झाल्यानंतर ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी नवनिर्वाचित महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि उपमहापौर कृष्णा पाटील यांचे तुळशीचे रोप देऊन अभिनंदन आणि स्वागत केले.शिवसेना आणि भाजप युतीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी भगवे फेटे आणि उपरणे परिधान करत पालिका सभागृहात प्रवेश केला. यावेळी महापौर आणि उपम हापौरांची निवड होताच तुतारीच्या गजरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. एकमेकांना मिठाई देत तोंड गोड करुन या निवडीचे उपस्थितांनी स्वागत केले.

# आमदार अमित देशमुखांसमोर हत्येचा थरार

**लातूर :** लातूर शहरात मागील काही दिवसांपासून खुनाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मित्रानेच जुनी कुरापत उरकून काढत मित्राचा खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात एका मित्राने दुसऱ्या मित्राला चाकूने भोसकून भर रस्त्यात खून केला आहे. लातूर शहरातील गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहिला नसल्याचे बोलले जात आहेत. निवडणुकीच्या काळात लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित देशमुख प्रचार सभा संपवून त्यांच्या मूळ गावी म्हणजे बाभळगाव निघाले असताना खुनाची घटना नुकतीच घडली होती, ते आयत्यावेळी त्या ठिकाणी आल्याने पोलिसांना तात्काळ त्यांनी सूचना दिल्या. त्यांच्यासमोरच रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या शिंदेला रिक्षात बसून त्याच्या मित्रांनी लातूरच्या स्वरूपच्या रुग्णालयामध्ये दाखल केले उपचार दरम्यान प्रज्वल शिंदे याचा मृत्यू झाल्याची घोषणा डॉक्टरांनी केली. लय दिवसापासून तू मझ्या डोक्यात बसलास, असे म्हणत २९ वर्षीय तरुणावर त्याच्याच मित्रांनी धारदार शस्त्राने छातीत, बरगडीत, पोटात आणि मानेवर चाकूने भोसकून खुन केल्याचा प्रकार रात्री उशिरा सम ोर आला आहे. एकामागे एक वर्मी घाव बसल्यानंतर




जमिनीवर कोसळलेल्या तरुणाची अवस्था बघुन 'गोट्याची विकेट पडली, पळ...' असे म्हणत फरार झालेल्या दोघांना पहाटे २.३० वाजता अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खून झाला तेव्हा हे दोनही आरोपी नशेत असावेत अशी माहिती समोर आली आहे.शहरातील बौद्धनगर येथे राहणारे आणि व्यवसायाने मजूर असलेले प्रज्वल उर्फ गोट्या संजय मस्के (वय २१) हा आपला चुलत भाऊ आतिश बाबासाहेब मस्के (वय २३) याच्या सोबत रात्री ११ वाजेच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तील लाइफ लाईन हॉस्पिटलसमोर थांबला होता. यावेळी आंबेडकर चौक – परिसरात ओळखीचे गणेश सुरेश गायकवाड आणि भिमा सूर्यवंशी हे दोघेही तिथे आले. त्यातील गणेश गायकवाड याने मोठ्याने आवाज देत प्रज्वल मस्के याला बोलावून घेतले. प्रज्वल मस्के त्यांच्याकडे जाताच त्यांच्यात जुना बाद उफाळून आला. वादाचे रूपांतर शाब्दिक चकम कीत झाले आणि लगेचच शिवीगाळ सुरू झाली. 'तू मला लई दिवसांपासून डोक्यात बसलास, आज तुझा कायमचा बंदोबस्त करतो,' अशी धमकी देत गणेश गायकवाड याने आपल्या कमरेला असलेला धारदार चाकू काढून प्रज्वल मस्के याच्यावर वार केला.दरम्यान, भिमा सूर्यवंशी याने आतिश मस्केला धक्का देत बाजूला ढकलले आणि त्यालाही जीवे म ारण्याच्या उद्देशाने हल्ला केला, मात्र त्यांनी कशीबशी सुटका करुन पळ काढला. आरोपींनी प्रज्वल मस्के याच्यावर पोटात व छातीवर वार केल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला, त्याला तत्काळ शासकीय दवाखान्यात हलविण्यात आले. मात्र उपचार दरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी आतिश मस्के याच्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलिसांत गणेश सुरेश गायकवाड आणि भिमा सूर्यवंशी (दोघे रा. आनंद नगर, लातूर) यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.आज एकाचा बर्थडे आहे असे आरोपीने दुपारीच मित्रांना सांगितले होते. आम्ही रात्री बॅनर तयार करण्यासाठी आंबेडकर चौकात आलो होतो. तेथे आमच्याच परिसरातील विकास गायकवाड याला कोणीतरी मारहाण केल्यामुळे त्याला चौकातील लाइफ लाईन हॉस्पिटलमध्ये नेल्याचे समजले, म्हणून तिथे थांबलो. त्याच वेळी बाजुच्या पान टपरीच्या मागे दोन्ही आरोपी थांबले होते. त्यांनी गोट्याला बोलावून घेतले. तो एकटाच तिकडे गेला आणि त्यांची बाचाबाची झाली. जोरजोरात आवाज येत असल्यामुळे आम्ही तेथे पोचलो तर एकाच्या हातात कोयता आणि दुसऱ्याच्या हातात सुरा होता. आरोपी गोट्याच्या पोटात आणि छातीत सुरा खुपसत होते. गोट्या खाली पडल्यावर 'गोट्याची विकेट पडली पळ आता....' असे आरोपी एकमेकांना बोलले आणि तेथून पळून गेले. त्याच्या छातीतच चाकू लागला असेल म्हणून मी छातीला दाबून धरलो परंतु नंतर कळाले की त्याच्या पोटातूनही रक्त येत होते. गोट्या आधी राजकारणात पदाधिकारी होता. त्याचाही राग आरोपींच्या मनात होता म्हणूनही कदाचीत त्याला मारले असावे', असे त्याच्या भावाने सांगितले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या निमि त्ताने महापूर येथील प्रचार सभा आटपून बाभळगावकडे परतत होते. रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून जात असताना, त्यांना एका तरुणावर चाकूने हल्ला होत असल्याचे निदर्शनास आले.

## आर्सेनिक मिसळलेले पेढे, आजोबा-नातीचा जीव घेणारे तीघे सापडले

**भोपाळ :** विषारी पेढा खाल्ल्यामुळे आजोबा-नातीसह सुरक्षारक्षकाचा मृत्यू झाल्याप्रकरणी तिघा नातेवाईकांना अटक करण्यात आली आहे. मयत खुशबूने तिच्या सासरच्या मंडळींवर केलेल्या आरोपांमुळे समाजात त्यांची मोठी बदनामी झाली होती. त्यामुळे सासरे, दीर आणि नणंद यांनी खुशबूवर विषप्रयोग करण्याचा कट रचला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशमधील छिंदवाडा येथे राहणाऱ्या खुशबूचा विवाह जानेवारी २०२४ मध्ये झाला होता. मात्र सासरी आपला छळ होत असल्याचा आरोप केला होता. सुनेच्या आरोपांमुळे चारचौघात बदनामी झाल्याच्या भावनेतून खुशबूचे सासरे झाडू केसर, दीर शुभम आणि नणंद शिवानी यांनी विषारी पेढे देऊन तिचा काटा काढण्याचा प्लॅन रचला.कटानुसार आरोपींनी खुशबूच्या वडिलांच्या दुकानावर आरोपींनी एक पिशवी टांगली. त्यामध्ये सोमल (आर्सेनिक) मिसळलेले पेढे होते. आधी वॉचमन दशरु यदुवंशी याने पेढा खाल्ला आणि त्याचा मृत्यू झाला.खुशबूच्या आईला याविषयी समजलं नव्हतं. तिने पेढ्यांचा डबा दुकानातून घरी आणला.



त्यावेळी खुशबू, तिची बहीण पूजा, त्यांची आई आणि खुशबूच्या आजोबांनी पेढा खालला. त्यामुळे चौघांची प्रकृती बिघडली. उपचारादरम्यान खुशबू आणि आजोबा या दोघांनी प्राण सोडले, तर पूजा आणि तिच्या आईची तब्येत स्थिर आहे.आरोपींनी पेढ्यात वापरलेले सोमल हे स्थानिक जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी वापरतात. अन्न आणि औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत पेढ्यातील आर्सेनिकची पातळी सामान्यापेक्षा एक हजार पट अधिक असल्याचे आढळले. तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी तिघा आरोपींना बेड्या ठोकल्या.

५७ वर्षीय झाडू केसर, त्यांचा २४ वर्षीय मुलगा शुभम आणि २२ वर्षीय मुलगी शिवानी यांना अटक करण्यात आली आहे.

## सिगारेट आणि ५ हजारांसाठी पिस्तुल रोखली

**छत्रपती संभाजीनगर :** संभाजीनगरातून एक फिल्मी स्टाईल घडामोड समोर येते आहे. हा स्टोरी ऐकून तुम्हाला एखाद्या चित्रपटाची स्टोरी वाटेल. पण तसं नाही आहे. हि घडामोड अगदी खरी आहे. खऱ्या जीवनातील आहे.शहरातील गजबजलेला भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निराला बाजार परिसरात एका पान टपरीचालकाला पिस्टल आणि चाकूचा धाक दाखवून लुटल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सिगारेट आणि ५ हजार रुपयांच्या मागणीवरून सुरू झालेला हा वाद थेट प्राणघातक धमकी आणि लुटीपर्यंत पोहोचला. याप्रकरणी क्रांतीचौक पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साहील चांडक, करण गणेश तांदळे रा. दगडगल्ली, औरंगपुरा,जय भांडारकर, रितेश पहाडिया असे आरोपींचे नाव आहे.या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,निराला बाजारमधील अशोका रेस्टॉरंटच्या शेजारी आशिष राम ेश्वर काष्टे यांची 'जय भवानी पान सेंटर' नावाची टपरी आहे. १ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास काही तरुण दुचाकीवरून तिथे आले.

## रागाच्या भरात घराबाहेर गेलेला तरुण सापडला, पण विहिरीत तरंगत होता

**बीड :** गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील अंबिका नगर परिसरातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या रामेश्वर मोहन शिंगणे (वय २५) या तरुणाचा मृतदेह मंगळवारी स्थानिक विहिरीत आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रामेश्वर शिंगणे त्याला गोरख या नावानेही ओळखले जात होते हा तरुण ३१ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी काही घरगुती कारणास्तव रागाच्या भरात घराबाहेर पडला होता. घराबाहेर पडताना त्याने आपल्या आईला कल्पना दिली होती, मात्र रात्र उलटूनही तो घरी परतला नाही.

सुरुवातीला नातेवाईकांनी तो मि त्राकडे किंवा ओळखीच्या ठिकाणी गेला असावा असा अंदाज बांधला. मात्र, सर्वत्र शोध घेऊनही त्याचा कोणताही सुगावा लागला नाही.रामेश्वरचा शोध लागत नसल्याने चिंताग्रस्त झालेल्या त्याच्या आईने अखेर सोमवारी तलवाडा पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या




तक्रारीवरून पोलिसांनी तरुण बेपत्ता असल्याची अधिकृत नोंद केली होती. पोलीस आणि नातेवाईक त्याचा शोध घेत असतानाच, आज (मंगळवारी) सकाळी अंबिका नगर भागातील एका विहिरीत एक मृतदेह तरंगताना नागरिकांना दिसून आला. ही माहिती वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी मोठी गर्दी जमली.विहिरीत मृतदेह असल्याची माहिती मिळताच तलवाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कैलास अन्नादास, बीट अंमलदार अंजन गडदे आणि पोलीस हवालदार नारायण काकडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आला, तेव्हा तो रामेश्वर शिंगणे याचाच असल्याचे निष्पन्न झाले.

## प्रियकराच्या छळाला कंटाळली आई, मुलाची मदत घेतली अन काढला काटा

**पिंपरी-चिंचवड :** प्रियकराच्या सततच्या त्रासाला कंटाळून प्रेयसीने आपल्या मुलगा आणि त्याच्या मित्राच्या मदतीने प्रियकराची हत्या केल्याची धक्कादायक घटना पुणे जिल्ह्यातील चाकण परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणात उत्तर चाकण पोलिसांनी तब्बल २० दिवसांच्या तपासानंतर तिघा आरोपींना अटक केली असून, दारूच्या बाटल्या आणि सिगारेटच्या आधारे गुन्ह्याचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. मुंजा धोंडीबा नरहरे (वय २५) याचे उषा नानासाहेब चव्हाण (वय ४०, विवाहित) हिच्याशी गेल्या सहा वर्षांपासून प्रेमसंबंध होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून मुंजा उषाला बेदम मारहाण करत होता आणि मानसिक व शारीरिक त्रास देत होता. या त्रासाला कंटाळून उषा चव्हाण हिने पुण्यात कामानिमित्त आलेल्या आपल्या मुलगा निखिल नानासाहेब चव्हाण (वय २१) याच्याकडे आपली व्यथा मांडली. ती स्वतः चाकण येथे मुलाकडे आली. प्रियकराकडून होणाऱ्या मारहाणीची माहिती दिल्यानंतर उषा चव्हाण आणि तिचा मुलगा निखिल यांनी मुंजा नरहरेची हत्या करण्याचा कट रचला. या कटात निखिलचा मित्र स्वप्नील नरहरी पारधी यालाही सहभागी करून घेण्यात आले.७ जानेवारी रोजी उषा चव्हाण हिने मुंजा नरहरे याला चाकणमध्ये भेटण्यासाठी बोलावले. गंगाखेड येथून मुंजा चाकणला आल्यानंतर निखिल आणि स्वप्नील यांनी






दुचाकीवरून त्याला सोबत घेतले. त्यानंतर खराबवाडी येथील मद्यविक्री दुकानातून दारूच्या बाटल्या खरेदी करून बिरदवाडी येथील ओढ्याजवळील निर्मनुष्य ठिकाणी दारू पार्टी करण्यात आली.दारू पित असतानाच निखिल आणि स्वप्नील यांनी मुंजा नरहरेवर कोयत्याने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या केली. ओळख पटू नये म्हणून मृतदेहाचा चेहरा दगडाने ठेचून विद्रूप करण्यात आला.७ जानेवारी रोजी ही घटना घडल्यानंतर ११ जानेवारी रोजी त्या परिसरात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती उत्तर चाकण पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तपास सुरू केला; मात्र आरोपींनी मृताची ओळखपत्रे आणि मोबाईल काढून घेतल्याने सुरुवातीला कोणताही ठोस पुरावा हाती लागत नव्हता.तरीही पोलिसांनी हार न म ानता सीसीटीव्ही फुटेज आणि परिसरातील कंपन्यांमधील कामगारांकडे कसून चौकशी सुरू ठेवली. पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत असताना घटनास्थळी आढळलेल्या दारूच्या बाटल्या आणि सिगारेटच्या आधारे पोलिसांनी खराबवाडी येथील मद्यविक्री दुकानांमध्ये चौकशी केली.

# पाकिस्तानला अरेरावीपणा महागात पडणार, कोटींचे नुकसान होणार, आयसीसीकडून मोठी कारवाई

**मुंबई/वृत्तसंस्था :** मंगळवारी पीसीबीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्धच्या सामन्यावर पाकिस्तानने बहिष्कार टाकल्यानंतर आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला अधिकृत ढ२० थीश्रव उँीं २०२६ प्रसारकांकडून कायदेशीर कारवाईची शक्यता असल्याचा इशारा दिला आहे. पाकिस्तानने आपल्या सरकारच्या सूचनांचे पालन करून १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे सामना न खेळण्याचा निर्णय घेतला, परंतु अद्याप खउउ त्याची कारणे अधिकृतपणे कळवली नाहीत. पीटीआयच्या वृत्तानुसार, आयसीसी पाकिस्तानचा संपूर्ण वार्षिक महसूल हिस्सा, अंदाजे ३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे जवळजवळ ३०० कोटी रोखू शकतात आणि त्या निधीतून प्रसारकांना भरपाई देऊ शकते अशी शक्यता आहे. पीसीबीच्या एका सूत्राने सांगितले की, जरी अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी गेल्या आठवड्यात पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना या मुद्द्यावर माहिती देण्यापूर्वी बोर्डाच्या कायदेशीर तज्ज्ञांशी चर्चा केलीपीसीबीच्या सूत्राने सांगितले की, 'जर पाकिस्तानने माघार घेतली




नाही आणि भारताविरुद्ध खेळला नाही, तर त्यांना केवळ आर्थिक दंड आणि कदाचित प्रसारकांकडून खटला भरावा लागेल.' पीसीबीच्या दुसऱ्या सूत्राने पीटीआयला सांगितले की, 'भारताविरुद्ध खेळू नये असे सरकारचे निर्देश असूनही पीसीबीला अडचणी येऊ शकतात, कारण ते त्यांचे सर्व सामने भारतात न खेळता त्यांच्या इच्छेनुसार तटस्थ ठिकाणी (श्रीलंका) खेळत आहेत.'सूत्र पुढे म्हणाले, 'दुसरे म्हणजे, भारत सरकारने त्यांच्या संघाला पाकिस्तानमध्ये खेळण्याची परवानगी दिली नसली तरी, मे महिन्यातील संघर्षानंतरही आशिया कप किंवा आयसीसी स्पर्धांमध्ये तटस्थ ठिकाणी पाकिस्तानविरुद्ध खेळण्यापासून रोखले नाही.' पीसीबीने अद्याप आयसीसीला त्यांच्या निर्णयाची लेखी माहिती दिलेली नाही. 'जेव्हा आयसीसीने सर्व आयसीसी स्पर्धांसाठी प्रसारकासोबत चार वर्षांचा करार केला, तेव्हा करारात पाकिस्तान आणि भारताशी संबंधित सामने समाविष्ट होते, ज्याच्या आधारे प्रसारकाने आयसीसीला पैसे दिले,' सूत्राने सांगितले. विश्वसनीय सूत्रांनी सांगितले की पीसीबीने या प्रकरणात समर्थनासाठी इतर सदस्य मंडळांशी संपर्क साधला, परंतु त्यांना कोणताही पाठिंबा मिळाला नाही.' भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १५ फेब्रुवारी रोजी रंगणार आहे.

# भारतीय संघाला सतावतेय 'ती' एक भीती

**मुंबई/वृत्तसंस्था :** भारतीय क्रिकेट संघ २०२६ चा टी-२० विश्वचषक जिंकण्यासाठी सज्ज आसल्याचे संघाच्या कामगिरीवरुनच कळत आहे. आता पहिला सामना ७ फेब्रुवारीला रंगणार आहे. भारताचा पहिला सामना हा अमेरिकेविरुद्ध असणा आहे. आता यापूर्वी भारतीय संघ काही सराव सामने खेळत आहे. पण आता ढ२० थीश्रव उँीं २०२६ पूर्वी भारतासाठी एक बाब चिंतेचा विषय ठरत आहे.

Washington Sundar अजूनही फिट झाला नसून त्याला खेळण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. ४ फेब्रुवारी रोजी त्याची आणखी एक चाचणी होणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हा खेळाडू बीसीसीआय सेंटरमध्ये रिहॅब प्रक्रियेतून जात आहे, परंतु अद्याप त्याला गोलंदाजी करण्याची परवानगी मिळालेली नाही. त्याचे आणखी एक गोलंदाजी सत्र असेल, त्यानंतर तो विश्वचषक खेळणार की नाही याबाबत माहिती समोर येईलअहवाल असे दर्शवितात की वॉशिंग्टन सुंदर अद्याप तंदुरुस्त नाही, जरी त्याने रिहॅब प्रक्रियेत चांगली प्रगती केली आहे आणि चार फलंदाजी सत्रे पूर्ण केली आहेत. त्याने २ फेब्रुवारी रोजी गोलंदाजी केली, चार षटके गोलंदाजी केली. ४ फेब्रुवारी रोजी त्याचे आणखी एक गोलंदाजी सत्र असेल. त्यानंतर, भविष्यातील रणनीती ठरवली जाईल. न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात वॉशिंग्टन सुंदरला दुखापत झाली होती, त्यानंतर तो एकदिवसीय मालिकेतील उर्वरित दोन सामने आणि टी-२० मालिकेतील सर्व पाच सामने खेळू शकला नाही.



जर वॉशिंग्टन सुंदर बाहेर पडला तर टीम इंडियाकडे एक बदली खेळाडू तयार आहे. आयुष बदोनी आणि रियान पराग इंडिया अ संघाकडून खेळत आहेत, हे दोघेही सुंदरच्या जागी संघात सामील होऊ शकतात. बदोनीने अमेरिकेविरुद्धही शानदार कामगिरी केली. बदोनीने अमेरिकेविरुद्ध धमाकेदार ६० धावा केल्या आणि एक विकेटही घेतली. रियान पराग देखील आता तंदुरुस्त आहे.

टी-२० विश्वचषकापूर्वी सराव सामने खेळण्यासाठी भारतीय संघ नवी मुंबईत दाखल झाला आहे. भारत ४ फेब्रुवारी रोजी डीवाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळणार आहे. या सामन्यात टीम इंडिया आपला सर्वात मजबूत प्लेइंग इलेव्हन मैदानात उतरवू शकते.

# स्मृती-जेमिमा आमने सामने, दिल्ली ट्रॉफी जिंकण्यासाठी सज्ज

**वडोदरा :** महिला प्रीमियर लीग २०२६ चा एलिमिनेटर सामना दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यात वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळला गेला. दिल्ली कॅपिटल्सची कर्णधार जेमिमा रॉड्रिग्जने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने दिल्लीला १६९ धावांचे लक्ष्य दिले. आता दिल्लीने ७ विकेट्सने सामना जिंकला. गुजरातने सलग तीन सामने जिंकून या टप्प्यावर पोहोचली, तर दिल्लीने उत्तर प्रदेशला हरवून एलिमिनेटरमध्ये प्रवेश केला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. आता दिल्ली कॅपिटल्स सलग चौथ्यांदा फायनलमध्ये पोहोचली.

प्रथम फलंदाजी करताना गुजरातने दिल्लीला १६९ धावांचे लक्ष्य दिले. दिल्लीने हे लक्ष्य १५.४ षटकांत ७ गडी गमावून पूर्ण केले. सलग चौथ्या हंगामात दिल्ली अंतिम फेरीत पोहोचण्यात यशस्वी झाली. प्रथम फलंदाजी करताना गुजरात जायंट्सची




सुरुवात चांगली झाली नाही. संघाला पहिला धक्का ९ धावांवर बसला. त्यानंतर ३८ धावांवर असताना सहाव्या षटकात दोन चेंडूंत दोन विकेट पडल्याने त्यांना दुहेरी धक्का बसला. गुजरातने नियमित अंतराने विकेट गमावत राहिल्यास, बेथ मुनीने गड राखला. तिने डावाची सुरुवात केली आणि शेवटपर्यंत नाबाद राहिली. तिने ५१ चेंडूंत नाबाद ६२ धावा केल्या. तिच्यासोबत जॉर्जिया वेअरहॅमने २५ चेंडूंत ३५ धावा केल्या. अनुष्का शर्माने १६ आणि काशवी गौतमने १८ धावांचे योगदान दिले.लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीने चांगली सुरुवात केली.

# हिटमॅन रोहित शर्माच्या प्रतिक्रियेचा व्हिडिओ व्हायरल

**मुंबई/वृत्तसंस्था :** रोहित शर्माकडे सध्या भारतीय संघाची कमान नाही. टी-२० भारतीय संघाची कमान सूर्यकुमार यादवकडे आहे. तर एकदिवसीय आणि कसोटी क्रिकेट संघाची कमान शुभमन गिलकडे आहे. भारत आणि न्यूझीलंडमध्ये एकदिवसीय मालिका रंगली ज्यात रोहित शर्माला हवी तशी कामगिरी करता आली नाही. नुकतेच रोहित शर्माला देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मश्री मिळाला आहे. या पुरस्कारानंतर ठेहळीं डहरीर काय प्रतिक्रिया दिली ते पाहा..माजी भारतीय क्रिकेट कर्णधार रोहित शर्माने देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मश्री मिळाल्याबद्दल आनंद आणि कृतज्ञता व्यक्त केला. 'हा क्षण माझ्यासाठी आणि माझ्या



कुटुंबासाठी एक अतिशय खास क्षण आहे. मी भारतासाठी सामने जिंकण्यासाठी प्रयत्नशील राहतील. भारत सरकार आणि मला माझ्या क्रिकेट कारकिर्दीत ज्यांनी पाठिंबा दिला त्या सर्वांचे मीआभार मानतो. हा सन्मान केवळ माझाच नाही तर माझ्या प्रवासात योगदान देणाऱ्या प्रत्येकाचा आहे.२००७ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून, रोहित शर्मा सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये भारताच्या सर्वात सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्यांपैकी एक आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्षणीय यश मिळवले. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने २०२४ मध्ये अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेला हरवून टी-२० विश्वचषक जिंकला. या विजयाने भारताची बहुप्रतिक्षित आयसीसी टी-२० ट्रॉफी संपुष्टात आणली. त्यानंतर, २०२५ मध्ये भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी देखील जिंकली.कसोटी क्रिकेटमध्ये, त्याने ६७ सामन्यांमध्ये १२ शतके झळकावली आहेत आणि ४,३०० हून अधिक धावा केल्या आहेत. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये, त्याने २८२ सामन्यांमध्ये ३३ शतके झळकावली आहेत, ११,५०० हून अधिक धावा केल्या आहेत. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये त्याची कामगिरी देखील उत्कृष्ट आहे. या स्वरूपात, त्याने पाच शतके आणि ४,२३१ हून अधिक धावा केल्या आहेत, ज्यामुळे तो सर्वात यशस्वी टी-२० फलंदाजांपैकी एक बनला आहे. रोहित शर्माने आता कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी तो एकदिवसीय क्रिकेट खेळत आहे. २०२७ च्या विश्वचषकात भारतासाठी खेळण्याचे त्याचे ध्येय आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राधा पाटीलच्या टोमण्यांवर Gautami Patil चं सडेतोड उत्तर, कुठून सुरू झालेला वाद?

**मुंबई :** बिग बॉस मराठी सीजन ६ मुळे राधा पाटील बरीच चर्चेत आली. पण तिला पहिल्या एलिमिनेशन मध्येच हा शो सोडावा लागला. त्यानंतर तिने माध्यमांना बऱ्याच मुलाखती दिल्या. राधाची तुलना ही बरेचदा गौतमी पाटील शी केली जाते. दोघीही बरेचदा एकमेकींवर अप्रत्यक्षरीत्या टीका करत असतात. आता गौतमी पाटील ने राधाच्या टिकेवर सडेतोड उत्तर दिलं आहे.अभिजात मराठीला दिलेल्या मुलाखतीमध्ये गौतमी पाटील म्हणाले की माझ्यावर तिचं खूप प्रेम आहे. मी नेहमीच म्हणते की माझ्याबद्दल कोणी काही बोललं तर मला त्याचा फरक पडत नाही. मी एका कानाने ऐकते आणि दुसऱ्या कानाने सोडून देते. हाच





माझ्या आयुष्याचा मंत्र आहे. माझं नाव घ्यायचं आणि काहीही बोलायचं? पण ठीक आहे... या सगळ्या गोष्टी माझ्यासाठी आता नॉर्मल झाले आहेत.

त्रर्गीराळ झरींळश्र पुढे म्हणाली की, मी तर म्हणेन की तू बोल अजून बोल ,अजून टीका कर मला काही फरक पडणार नाही. लोकांना वाटतं की या टीकांमुळे मला काही फरक पडेल पण तसं नाहीये. माझ्या जवळच्या लोकांकडून मला अशा परिस्थितीत खूप पाठिंबा मिळतो. माझ्याबद्दल कोणी काही बोललं तर माझे सहकारी मला ते दाखवतात पण मला त्यावर काहीच प्रतिक्रिया द्यावीशी वाटत नाही. मला कोणाबद्दल बोलायला आवडत नाही. मला एक कळतं की आपल्याला ट्रोल करणाऱ्यांकडे लक्ष देण्यापेक्षा आपल्यावर जे प्रेम करतात त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. आज आपण त्यांच्यामुळेच इथे आहोत.सोशल मीडियावर मला बरेचदा ट्रोल केले जाते किंवा माझ्यावर टीका केली जाते. मात्र मी त्यांना काही उत्तर द्यायच्या आधीच माझ्यावर प्रेम करणाऱ्या लोकांनी त्यांना उत्तर दिलेली असतात. त्यामुळे मला याचा अभिमान वाटतो की मला फारसं बोलायची गरज पडलेली नाही. हे सगळं प्रेक्षकांचं प्रेम आहे आणि तेच मी टिकवण्याचा प्रयत्न करतेसांगलीत एका कार्यक्रमादरम्यान गौतमी पाटील उशिरा आली होती तेव्हा ती राधा बद्दल म्हणाली की कोण राधा पाटील ? तिची लेवल काय आहे? गौतमी तिथून निघून गेल्यावर तिथल्या माणसांनी राधाला तिच्या बोलण्याबद्दल सांगितले. ते म्हणाले की गौतमी तुझ्याबद्दल म्हणाली राधाची लेव्हल काय आहे? मी तिच्याबरोबर कशी नाचणार? हे सगळं ऐकून राधाला खूप वाईट वाटलेलं आणि त्यानंतर त्यांच्यातल्या वादाची ठिणगी पडलेली.

## भविष्यात मला मराठीत काम करण्याची संधी मिळाली तर..

**मुंबई :** हैदर आणि 'रंगून' या चित्रपटांप्रम णेच 'ओ रोमिओ' या सिनेमात अभिनय करण्याचा अनुभवही मस्त होता. हा सिनेमा म्हणजे मनाला भावणारी एक सुंदर प्रेमकथा आहे. ॲक्शन, ड्रामा, रोमांच या साऱ्यानं भरलेला परिपूर्ण असा हा सिनेमा आहे. कबीर सिंग' या सिनेमानंतर तू ठरवून विशिष्ट कालावधीचा ब्रेक घेत घेत सिनेमे करताना दिसतोस, तू हे खरंच ठरवून करतोस का?

मी काम करताना कधीच कोणत्याही प्रकारचं नियोजन करत नाही. कधीकधी कोणत्या प्रकारचं काम करायचं आहे, हे ठरवण्यासाठी मला थोडा वेळ लागतो. पण बहुतांश वेळा चांगलं काम समोर आलं, की मी वेळ वाया न घालवता ते लगेच स्वीकारतो.कबीर सिंग'च्या यशानंतर तुला त्याच धाटणीच्या भूमिकांसाठी विचारणा झाली का? नाही! 'कबीर सिंग'च्या आधीसुद्धा मी तशा प्रकारच्या भूमिका साकारल्या आहेत, 'कमिने', 'उडता पंजाब' या सिनेमांमधल्या माझ्या भूमिका खलनायक वृत्तीच्याच होत्या. सध्या मनोरंजनसृष्टीत मुख्य अभिनेता साकारत असलेल्या पात्राला खल वृत्तीची थोडीशी झालर असतेच. हा सध्याचा ट्रेंड आहे असं मला वाटतं.शांत, समजूतदार, प्रेमळ आणि रावडी बॉय, रुबाबदार अशा दोन्ही प्रकारच्या भूमिका तू साकारल्या आहेस. यातलं तुला कोणता प्रकार आवडतो ?

मुळात अभिनयात मी कोणताच भेद मानत नाही. म्हणूनच त्यात अमुक प्रकार आवडीचा आणि तमुक नावडीचा असं मी करत नाही. भूमिका नावीन्यपूर्ण असली, की ती साकारायला मला मजा येते. सतत नवीन काहीतरी करण्याच्या प्रयत्नात मी असतोखरं सांगू तर, स्पर्धा काय असते हेच मला माहिती नाही. दर शुक्रवारी एखाद्या शैलीतील सिनेमा छान चालतो; पण म्हणून तशाच धाटणीचा सिनेमा प्रेक्षकांना पुन्हा बघायला आवडेलच असं नाही. त्यामुळे मी स्पर्धा वगैरे या गोष्टींचा फार विचारच करत नाही. आपण केलेल्या कामाचं स्वतः ला समाधान मिळालं, की सगळं सोपं होतं.काही मराठी सिनेमे मला माहीत आहेत. मराठी सिनेमांचे आशय-विषय सुंदर असतात.

## अक्षय कुमारची 'गोलमाल ५' मध्ये एन्ट्री ; अजय देवगणसोबत करणार जबरदस्त ॲक्शन

**मुंबई :** २०२५ मध्ये बॉलिवूड स्टार अक्षय कुमारने ब्लॉकबस्टर चित्रपट दिले. ज्यात हाऊसफुल ५ चाही समावेश आहे. अक्षय कुमार २०२६ मध्येही धम ाल करणार आहे. त्याचा मोठा चित्रपट, वेलकम टू द जंगल, या वर्षी प्रदर्शित होणार आहे. लोक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. एका नवीन बातमीनुसार असा दावा करण्यात आला आहे की अक्षय कुमारला आणखी एक चित्रपट मिळाला आहे.



बॉलिवूडमधील सर्वात उत्तम कॉमेडी फ्रँचायझी, 'गोलमाल', त्याच्या पाचव्या भागासह परतणार आहे. रोहित शेट्टीच्या या चित्रपटात आता एक मोठा ट्विस्ट आला आहे. अक्षय कुमारने मुख्य खलनायक म्हणून चित्रपटात एन्ट्री केली आहे. यावेळी, अक्षय अजय देवगण आणि त्याच्या कॉमेडी टीमला टक्कर देणार आहे. व्हरायटी इंडियाच्या वृत्तानुसार, 'गोलमाल ५' हा आतापर्यंतचा सर्वात म ोठा चित्रपट असेल. अजय देवगणच्या या चित्रपटात त्याच्यासोबत अर्शद वारसी, तुषार कपूर, कुणाल खेमू आणि श्रेयस तळपदे आहेत. जॉनी लिव्हर, संजय मिश्रा, मुकेश तिवारी आणि अश्विनी काळसेकर देखील दिसतील. शर्मन जोशी परतण्याची अपेक्षा आहे. तसेच, करीना कपूर खानची कास्टिंग अद्याप निश्चित झालेली नाही. फेब्रुवारीच्या अखेरीस मुंबईतील फिल्म सिटीमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होईल आणि २०२७ च्या सुरुवातीला थिएटरमध्ये प्रदर्शित होईल.

अजय देवगण आणि अक्षय कुमार यांनी अनेक चित्रपटांमध्ये आपल्या अभिनय कौशल्याचे दाखवले आहे. चाहत्यांना त्यांची जोडी खूप आवडते. अक्षय आणि अजय यांनी 'सुहाग', 'खाकी', 'इंसाफ', 'सूर्यवंशी' आणि 'सिंघम अगेन' सारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे.

## रणवीर सिंगच्या 'धुरंधर २'चा धमाकेदार टिझर रिलीज

**मुंबई :** २०२५ मधील सर्वात गाजलेला चित्रपट धुरंधर च्या सिक्केलचा टीझर प्रदर्शित झाला आहे. गेल्या वर्षी डिसेंबरम ध्ये प्रदर्शित झालेल्या आदित्य धर यांचा 'धुरंधर' या चित्रपटाचा दुसरा भाग धुरंधर २लवकरच चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या टीझरने पुन्हा एकदा चाहत्यांम ध्ये उत्साह निर्माण केला आहे. टीझरच्या अगदी आधी, 'धुरंधर २' चे पोस्टर देखील प्रदर्शित करण्यात आला आहे. चित्रपटाच्या टीझरमध्ये हमजा अली म जारीचे वेगवेगळे पैलू दिसून आले आहे.

'धुरंधर' चा दुसरा भाग 'धुरंधर २' ची पहिली झलक प्रदर्शित झाली आहे. मंगळवार, ३ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित



झालेल्या टीझरवरून स्पष्टपणे दिसून येते की हा चित्रपट प्रेक्षकांना पुन्हा थिएटरमध्ये घेऊन येणार आहे. पाकिस्तानातील कराची येथील लियारी भागातील राजकारण, टोळीयुद्धे आणि अंडरवर्ल्डवर आधारित या स्पाय-थ्रिलरमध्ये भारताने पाकिस्तानच्या हृदयात आपला रॉ एजंट कसा सोडला आहे हे उघड केले आहे. अंदाजे १ मिनिट १२ सेकंदाच्या या टीझरमध्ये हमजा अलीच्या भूतकाळातील आयुष्यापासून ते लियारी कब्जा केल्यानंतरच्या काळातील झलक दाखवण्यात आली आहे.

**लियारीमध्ये हमजाची हुकूमत**

पण, या टीझरमध्ये पहिल्या चित्रपटाच्या शेवटीची झलक दाखवण्यात आली आहेत, 'धुरंधर.' खरं तर, पहिल्या चित्रपटात या टीझरपेक्षा जास्त झलक दाखवण्यात आल्या आहेत. टीझर पाहिल्यानंतर प्रेक्षकांनी म्हटले आहे की, 'हा धुरंधर २००० कोटींचा टप्पा ओलांडेल.'

रणवीर सिंगचा चित्रपट १९ मार्च २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. पण, चित्रपटाबद्दल चाहत्यांच्या तर्क सोशल मीडियावर फिरत आहेत. पहिल्या चित्रपटात, 'धुरंधर' मध्ये, हमजा त्याचे गुपिते एका डायरीत लिहितो आणि आता असे म्हटले जात आहे की ही डायरी त्याला दगा देईल. नेटकरी म्हणतात की कदाचित येलीना हमजाची विश्वासघात करेल आणि त्याची गुप्त डायरी वापरेल. आता चित्रपटात काय असेल हे दोन म हिन्यात प्रेक्षकांना समजेल.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा थाटात शुभारंभ...

**जनसंचलन/बुलढाणा**

दैनंदिन जीवनात वाढते ताण-तणाव व मोबाईल तसेच समाज माध्यमांच्या वाढत्या अतिक्रमणामुळे विविध खेळ व संस्कृती लोप पावत आहेत. अशा वेळी आपल्या मातीशी नाळ घट्ट जुळलेली राहावी म्हणून अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास आमदार संजय गायकवाड यांनी व्यक्त केला. तसेच आगामी काळात बुलढाणा शहराची क्रीडा क्षेत्रात नवी ओळख निर्माण होईल व नाव लौकिक वाढेल यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक, इंडोर स्टेडियम व जलतरण तलाव उभारला जाणार असल्याची माहिती सुद्धा आमदार संजय गायकवाड यांनी याप्रसंगी दिली. बुलढाणा जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित अधिकारी कर्मचारी यांच्या तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा शुभारंभ आज आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते पार पाडला. स्थानिक जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात हे होते. यावेळी मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या सुविद्य पत्नी सौ. रिपिका खरात, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड. राज्य उत्पादन शुल्क उपायुक्त नवलकर, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक हांडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयोजन समितीचे सदस्य सचिव आशिष पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, सतीश देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अकाळ, जिल्हा जलसंधारण अधिकारी स्नेहल माने, कृषी विकास अधिकारी पुरुषोत्तम अनगाईत, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंडोगडे,सर्व पंचायत समितींचे गटविकास अधिकारी व विविध खातेप्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार संजय गायकवाड म्हणाले की, प्रशासकीय कामकाज करताना निर्माण होणारे ताणतणाव लक्षात घेता त्यामधून मुक्त होण्यासाठी प्रत्येकाला विविध छंद जोपासणे आवश्यक आहे. सुदृढ शरीर व सशक्त मनासाठी आपल्या अंगी असलेल्या कलागुणांचा तसेच क्रीडा क्षमतांचा विकास गरजेचा आहे. त्या दृष्टीने ग्रामीण भागाच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेसारख्या भव्य यंत्रणेमधील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित होणाऱ्या ह्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा निश्चितच उपयुक्त आहेत. या तीन दिवसीय उपक्रमाचा सर्वांनी आनंद घेऊन नव्या जोमाने जनसेवेत रुजू व्हावे. यासाठी सुद्धा आमदार संजय गायकवाड यांनी सर्व सहभागी अधिकारी कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या. क्रीडा प्रकारातील विविध सामने तसेच सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत होणारे विविध कला गुणदर्शनाच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या पंचांनी सुद्धा भानगडी न करता वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून यथोचित स्पर्धकांना न्याय द्यावा, अशी कोपरखळी सुद्धा आमदार संजय गायकवाड यांनी दिली. आपल्या समयोचित अध्यक्षीय मार्गदर्शनात मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी खेळाडूंना देण्यात आलेल्या शपथेचा संदर्भ देऊन शिस्त व सभ्यतापूर्वक हा तीन दिवसीय स्पर्धांचा कार्यक्रम यशस्वी करण्याबाबत उपस्थितांना आवाहन केले. तसेच बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड हे स्वतः क्रीडापटू असल्याने व त्यांनी ठोसपणे क्रीडा विकासासाठी विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे घोषित केल्याबद्दल आभार व्यक्त केले. आपल्या प्रास्ताविक पर भाषणात उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयोजन समितीचे सचिव आशिष पवार यांनी दिनांक ४ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांच्या होत असलेल्या आयोजना बाबतची पार्श्वभूमी विशद केली. उद्घाटन समारंभाच्या सुरुवातीलाच राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी महाराष्ट्र गीत गायन केले. आमदार संजय गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात व मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन, क्रीडा ध्वजारोहण, क्रीडा ज्योत प्रज्वलन करून सर्व खेळाडूंना शपथ देण्यात आली. यावेळी संगीतमय वातावरणात व आकाशात विविध रंगी फुगे सोडून स्पर्धांचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे यांनी तर आभार प्रदर्शन प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी केले.

# बुलढाण्यात राज्यस्तरीय शालेय शूटिंगबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल येथे १७ वर्षांखालील मुले व मुलींच्या राज्यस्तरीय शालेय शूटिंगबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. २ आणि ३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध विभागांतून खेळाडू, प्रशिक्षक आणि पंच अशा एकूण २११ जणांचा सहभाग होता. स्पर्धेचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कारार्थी टी.एस. सोर, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील आणि जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना सदाशिव शेलार यांनी खेळाडूंना क्रीडा क्षेत्रातील ५ टक्के आरक्षणाच्या संधीचा लाभ घेऊन करिअर घडविण्याचे आवाहन केले. टी.एस. सोर यांनी खेळाडूंचे मैदानाशी असलेले नाते अधोरेखित करत शूटिंगबॉल खेळाच्या विकासासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू गौरी म्हस्के हिने खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. तसेच गौरी म्हस्के, कार्तिकी गरगडे आणि डॉ. निकीता वाकोडे यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. रात्रीच्या वेळी प्रकाशझोतात झालेले सामने या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विविध तालुक्यांच्या क्रीडा अधिकाऱ्यांनी या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# प्रवाश्यांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन



**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत ‌‌प्रवासी राजा दिनफ व दुपारी ३ ते ५ या वेळेत ‌‌कामगार पालक दिनफ आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे. परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सांयकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील. बुलढाणा विभागातील बुलढाणा आगार येथे दि. ११ फेब्रुवारी रोजी तर चिखली आगार येथे दि. १८ फेब्रुवारी खामगाव आगार येथे दि. २५ फेब्रुवारी , मेहकर आगार येथे दि. ४ मार्च, मलकापुर येथे दि. ११ मार्च, जळगाव जामोद येथे दि. १८ मार्च व शेगांव आगार येथे दि. २५ मार्च रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# रोहणा येथे सिकलसेल व कुष्ठरोग स्पर्श अभियानांतर्गत जनजागृती

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान तसेच कुसुम कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (स्पर्श) अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, रोहणा येथे नागरिकांची तपासणी, समुपदेशन व व्यापक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. सुहासिनी शिरोडकर यांनी सिकलसेल तपासणीचे महत्त्व विशद केले. तसेच कुष्ठरोगाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून ‌‌स्पर्शफ अभियानाची उद्दिष्टे नागरिकांना समजावून सांगितली. वेळेवर तपासणी करून घेणे आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी धुताडमल यांनी मार्गदर्शन करताना ० ते ४० वर्षे वयोगटातील सर्व स्त्री-पुरुषांनी सिकलसेल तपासणी करून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. विशेषतः विवाहपूर्व सिकलसेल तपासणी करून घेणे महत्त्वाचे असून, त्यामुळे भविष्यातील आरोग्यविषयक धोके टाळता येऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये डॉ. एस. एल. शिराळकर (आयुर्वेदिक दवाखाना, वर्णा), वि. टी. माळे (), वी. स. खाडे (), एस. बी. भीमेवाल (), परिमल उंदरे (), जी. एस. लोड (परिचर), एस. डी. देशमुख (परिचर) यांचा सहभाग होता. तसेच ग्रामस्थांमधून अविनाश महाले (रोहणा), शामराव शास्त्री (वाघेरा), पांडुरंग शेळके आदी उपस्थित होते.

# संग्रामपूर शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन मेळावा संपन्न...

## २० वर्षानंतर भरली जुना मित्रांची शाळा...

**जनसंचलन/ संग्रामपूर**

शहरातील सध्या पीएम श्री जि.प. हायस्कूल मध्ये १ / फेब्रुवारी माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन मेळावा संपन्न झाला.

ह्या मेळाव्याचे अध्यक्ष स्थानी जि.प. हायस्कूलचे से.नि.प्र. मुख्याध्यापक श्रीरंग ढोकणे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून याच हायस्कूलची विद्यार्थिनी ही शिक्षिका तथा से.नि प्रभारी मुख्याध्यापिका चित्राताई राजनकर (सौ.निमकर्डे मॅडम) होत्या.प्रथम राष्ट्रगीत होऊन सरस्वती माता व संत शिरोमणी रविदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन राष्ट्रगीत झाले. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचे सर्व शिक्षकांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला. त्यानंतर माजी विद्यार्थी अनिलसिंग चव्हाण यांनी प्रास्ताविकातून २००५ ते २००६ मध्ये दहाव्या वर्गात असतांना शाळेतील जुने अनुभव व आताचे अनुभव व्यक्त केले. तसेच इतर विद्यार्थी ,विद्यार्थिनींनी सुद्धा आताचे नागरिक यांनीही आपआपले अनुभव सांगून शालेय जीवन एका चौकटीत व शिस्तबद्ध होते.आम्हाला सर्व शिक्षकांनी चांगले आचार ,विचार व शिक्षण दिले. म्हणून आम्ही नागरिक घडल्याचे सांगितले. पुन्हा २० वर्षानंतर जुन्या मित्रांची शाळा भरली अन् जुन्या गोड आठवणी एकदा पुन्हा ताज्या झाल्याचे नमूद केले. ह्याचवेळी शाळेला स्पीकर भेट देण्यात आला. ह्या प्रसंगी मोरणकर सर, राठोड सर, इंगळे सर, मारोडे सर, मेहरकर सर सह सर्व शिक्षक, शिक्षिका ,कर्मचारी वृंद उपस्थित होते. यावेळी शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.व समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन माजी विद्यार्थी प्रवीण वानखडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन विजय आकोटकर यांनी केले



# विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा ग्राम घिर्णी येथे शुभारंभ

**जनसंचलन/मलकापुर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न, गौरीशंकर सेवा समिती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय, मलकापूर (कॉलेज कोड ३२२) येथील राष्ट्रीय सेवा योजना (रा. से. यो.) विभागाच्या वतीने मलकापूर तालुक्यातील जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा, दत्तकग्राम घीर्णी येथे दिनांक ३१ जानेवारी २०२६ ते ०७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित विशेष शिबिराचे उद्घाटन रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मा. श्री मोरेशभाऊ महाजन, अध्यक्ष, गौरीशंकर सेवा समिती यांच्या हस्ते रेड रिबन कापून शिबिराचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. माच्या वर उपस्थित सर्व मान्यवरांनी सरस्वती माता आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांचे पूजन केले. उपस्थित सर्व मान्यवरचे स्वागत विद्यार्थ्यांनी केले. उद्घाटन समारंभात जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा, घीर्णी येथील मुख्याध्यापक श्री बघिले सर यांनी श्रमदान शिबिराचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले तसेच शाळेकडून आवश्यक ती मदत देण्याची ग्वाही दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. पी. पाटील यांनी शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, जबाबदारी व सामाजिक बांधिलकी निर्माण होणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक रा. से. यो. क्षेत्रीय समन्वयक डॉ. देविदास दरेगावे यांनी शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पर्यावरण संवर्धन या विषयांवर सखोल मार्गदर्शन करत शिबिराच्या उद्दिष्टांची सविस्तर भूमिका मांडली व स्वयंसेवकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख अध्यक्ष म्हणून उपस्थित मा. श्री मोरेशभाऊ महाजन यांनी स्वयंसेवकांचे कौतुक करत एकात्मिक बळ, संघभावना व राष्ट्रनिर्मितीत युवकांचे महत्त्वपूर्ण योगदान या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमास ग्रामपंचायत सरपंच प्रमिलाबाई चोपडे, शाळा समितीचे अध्यक्ष श्री रविभाऊ चव्हाण, विज्ञान महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. झोपे सर तसेच वरिष्ठ लिपिक श्री मधुकरभाऊ कोलते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राहुल निकम यांनी केले, तर कार्यक्रमाच्या शेवटी महिला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. सी. पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय सेवा योजना (रा. से. यो.) च्या लक्ष्यगीताने करण्यात आली. या उद्घाटन कार्यक्रमामुळे स्वयंसेवकांमध्ये उत्साह, शिस्त, सामाजिक जाणीव व एकोप्याचे वातावरण निर्माण झाले. स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध, उत्स्फूर्त व सक्रिय सहभागामुळे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचा उद्घाटनाचा दिवस अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

# सुलतानपूरच्या सुपुत्राचा महाराष्ट्रात डंका! अमित गोविंद मंत्री यांना महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड प्रदान




**जनसंचलन/ सुलतानपूर**

ग्रामीण मातीतील जिद्द आणि जागतिक दर्जाची दृष्टी यांचा संगम असलेल्या सुलतानपूर (ता. लोणार) येथील सुपुत्राने उद्योग जगतात मोठी भरारी घेतली आहे. हायविनो फार्मास्युटिकल्स प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. अमित गोविंद मंत्री यांना औषधनिर्माण क्षेत्रातील त्यांच्या क्रांतिकारी योगदानाबद्दल ङ्महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड २०२५फ देऊन गौरविण्यात आले आहे. शून्यातून विश्व निर्माण करणारा सुलतानपूरचा सुपुत्र अमित मंत्री यांनी अत्यंत जिद्दीने हायविनो फार्मास्युटिकल्सची स्थापना करून औषधनिर्माण क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. सुरक्षित, प्रभावी आणि सर्वसामान्यांना परवडणारी औषधे उपलब्ध करून देणे हा त्यांचा मूळ उद्देश आहे. त्यांच्या या कार्यामुळे सुलतानपूरसह संपूर्ण लोणार तालुक्याचे नाव आज राज्याच्या नकाशावर अभिमानाने झळकत आहे.

दिमाखदार सोहळा आणि उपस्थिती

हा पुरस्कार सोहळा मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी नाशिक येथील सोमा वाईन व्हिलेज येथे पार पडला. या सोहळ्याला मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री वर्षा उसगांवकर, सोनाली कुलकर्णी आणि प्रार्थना बेहेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शुअर मी ग्रुपचे संस्थापक सुधीर पाठाडे यांच्या नेतृत्वाखाली हा सन्मान प्रदान करण्यात आला.

यशाचे गमक: गुणवत्ता आणि विश्वास

उच्च दर्जा: हायविनो फार्मास्युटिकल्समार्फत उत्पादित प्रत्येक औषधात गुणवत्ता आणि सुरक्षिततेचे कठोर निकष पाळले जातात.

नवकल्पना: आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधनाधारित दृष्टिकोनामुळे कंपनीने अल्पावधीतच मोठी प्रगती केली आहे.

ग्रामीण प्रेरणा: ग्रामीण भागातून येऊन एवढे मोठे यश संपादन केल्यामुळे अमित मंत्री हे तरुण उद्योजकांसाठी प्रेरणास्थान बनले आहेत.

हा पुरस्कार म्हणजे माझ्या सुलतानपूरच्या मातीचा आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचा सन्मान आहे. अमित गोविंद मंत्री (, हायविनो फार्मास्युटिकल्स) अमित मंत्री यांच्या या ऐतिहासिक यशामुळे सुलतानपूर व परिसरात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

